महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि.२८/१०/२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# पाणी उपसा साधने - पंप संच व पाईप

## प्रस्तावना:

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षापासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीची संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून उत्पादकता वाढविण्यासाठी यापूर्वी विविध योजनामधून अनुदानावर संरक्षित सिंचन सुविधा राबविण्यात येत आहेत. त्यामुळे शेतक-यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होऊन शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. सद्यस्थितीत राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थिती पाहता व शेतक-यांकडे पिकास संरक्षित सिंचन देणेकरिता व्यवस्था निर्माण करण्यासाठी जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत पंप संच व पाईप हे वैयक्तिक लाभाचे घटक राबविणे प्रस्तावित आहे.

## उद्दिष्टे:

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गावसमुहातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. पाणी उपसा साधनांचा वापर करून संरक्षित सिंचनाची सोय निर्माण करणे.

## लाभार्थी निवडीचे निकष:

१. **प्रकल्पांतर्गत सदर घटकासाठी फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील, ५ हेक्टर पर्यंत जमीन धारणा असलेले शेतकरी पात्र असतील.**
२. सदर घटकाचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीला घेता येईल.
३. ज्या शेतकऱ्याकडे सिंचनासाठी पाणी उपलब्ध आहे, परंतु पाणी उपसा साधनाअभावी पीक उत्पादनात घट येते, अशा शेतकऱ्यांना लाभ देण्यात येईल.
४. पाणी उपसा साधने उपलब्ध असलेले तसेच या घटकाचा इतर कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना लाभ देय राहणार नाही.

## अर्थसहाय्य:

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणी उपसा साधने अंतर्गत विद्युत पंप संच/डिझेल इंजिन व पाईप या घटकासाठी अनुज्ञेय अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे;

| अ.क्र. | घटक | अनुज्ञेय अनुदान (रु.) |
|---|---|---|
| अ. | **पाणी उपसा साधने (पंप संच)** | |
| १. | विद्युत पंप (१० एच.पी. पर्यंत) | किंमतीच्या ९० टक्के किंवा उच्चतम रु.४०,०००/प्रती पंपसंच यापैकी जे कमी असेल ते |
| २. | डिझेल इंजिन (१० एच.पी. पर्यंत) | |
| ब. | **पाईप** | |
| १. | एच.डी.पी.ई. | प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रु. ३०,०००/- यापैकी जे कमी असेल ते |
| २. | पी.व्ही.सी. | |
| ३. | एच.डी.पी.ई. लॅमीनेटेड | |

संदर्भ: १. कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडील पत्र क्र.विप्र.७/डॉ.बाआकृस्वायो/मासु/२०२५-२६/र-९०१/२०२५; दि.२६/०५/२०२५ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या मार्गदर्शक सूचना सन २०२५-२६

२. कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडील पत्र क्र.विप्र.७/बिमुकृकायो/मासु/२०२५-२६/र-९००/२०२५; दि.२६/०५/२०२५ अन्वये बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेच्या मार्गदर्शक सूचना सन २०२५-२६

३. कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडील पत्र क्र.कृयाउप/गुनि-५/मा.सु./१२९२८/२०२५; दि.०५/०६/२०२५ अन्वये कृषि यांत्रिकीकरण उप अभियान योजनेच्या मार्गदर्शक सूचना सन २०२५-२६

४.कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडील पत्र क्र.कृआ/विप्र.१/अपोसु २४-२५/वाकृआ/प्र.क्र.१/मासू/२४/१५१९१; दि.०७/०६/२०२ अन्वये अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके योजनेच्या मार्गदर्शक सूचना सन २०२४-२५

## सर्वसाधारण सूचना

१. लाभार्थ्यास पंप संच व पाईप या दोन्ही घटकाचा लाभ घेण्याची मुभा राहील.
२. लाभार्थ्यास सदर घटकांतर्गत खालीलप्रमाणे नमूद तिन्ही प्रकारच्या पाईप पैकी कोणत्याही एका प्रकारचा पाईप घेता येईल. I) पीव्हीसी पाईप II) एचडीपीई पाईप III) एचडीपीई लॅमीनेटेड पाईप

| अ.क्र. | पाईप प्रकार | प्रचलित आर्थिक मापदंड |
|---|---|---|
| १. | एच.डी.पी.ई. | १०० रु. प्रती मीटर |
| २. | पी.व्ही.सी. | ७० रु. प्रती मीटर |
| ३. | एच.डी.पी.ई. लॅमीनेटेड | ४० रु. प्रती मीटर |

३. शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीनुसार ६३ एम एम, ७५ एम एम, ९० एम एम व्यासाचे पाईप घेता येतील.
४. सिंचनासाठी आय.एस.आय.मानांकित पाईपची लाभार्थ्यांनी त्यांच्या पसंतीनुसार खरेदी करावी.
५. पाईप खरेदी केल्यानंतर लाभार्थीने प्रत्येक पाईपवर शेतकऱ्याचे नाव, प्रकल्पाचे नाव व वर्ष टाकणे (EMBOSING) बंधनकारक आहे.

६. शेतक-यांना त्यांचे पसंतीनुसार **मोनोब्लॉक इलेक्ट्रीक पंपसंच अथवा ओपनवेल सबमर्सिबल ईलेक्ट्रीक पंपसंच** खरेदी करता येईल. १० एच पी पर्यंत क्षमतेच्या मोनोब्लॉक / ओपनवेल सबमर्सिबल ईलेक्ट्रीक पंपसंचाकरिता अर्थसहाय्य देय राहील, याची नोंद घ्यावी.
   I. **मोनोब्लॉक इलेक्ट्रिक पंप संचसाठी** आय.एस.आय. (ISI) मानांकित पंप व कपॅसिटर, मेन स्विच, उत्तम दर्जाचे पाईप, उत्तम दर्जाचे होज निपल (क्लिप सह), फूट व्हॉल्व, केबल, कंट्रोल पॅनल बॉक्स, अर्थिंगसाठी आवश्यक साहित्य या बाबी आवश्यक आहेत.
   II. **ओपनवेल सबमर्सिबल ईलेक्ट्रीक पंप संचसाठी** आय.एस.आय. (ISI) मानांकित पंप, स्टार्टर, कपॅसिटर, मेन स्विच, उत्तम दर्जाचे होज पाईप, उत्तम दर्जाचे Bend, उत्तम दर्जाचे होज निपल (क्लिप सह), केबल, कंट्रोल पॅनल बॉक्स, वायर रोप, अर्थिंगसाठी आवश्यक साहित्य या बाबी आवश्यक आहेत.
   III. **डिझेल इंजिन** या बाबीसाठी बि.आय.एस. (BIS) मानांकित पंप, उत्तम दर्जाचे पाईप, उत्तम दर्जाचे फूट व्हॉल्व, उत्तम दर्जाचे Bend, उत्तम दर्जाचे निपल क्लिप्स या बाबी आवश्यक आहेत.

७. लाभार्थींना त्यांच्या पसंतीनुसार निश्चित तांत्रिक निकषांनुसार खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्यांकडून पंप संच व पाईप खरेदी करणे आवश्यक आहे.

८. मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुद लाभार्थ्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात गंभीर त्रुटी आढळून आल्यास अथवा प्रकल्पांतर्गत प्राप्त लाभाचा गैरवापर केल्याचे सिद्ध झाल्यास अर्जातील आणि हमीपत्रातील अटी व शर्तीनुसार संबंधित लाभार्थ्यावर कारवाई होऊ शकते, याबाबत लाभार्थ्यास जाणीव करून द्यावी.

९. सदर मार्गदर्शक सूचनांमधील घटकाचा लाभ जास्तीत जास्त गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी घटकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

१०. मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

## अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-

### लाभार्थी

१. इच्छुक शेतकऱ्यांनी घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून अर्ज व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

२. मंजूर घटकाची खरेदी करण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. सदर घटकासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही.

३. मार्गदर्शक सूचनेमध्ये दिलेल्या तांत्रिक निकषाप्रमाणे लाभार्थीने त्यांच्या पसंतीनुसार खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्यांकडून घटकाची खरेदी करावी.

४. पूर्वसंमती मिळाल्यानंतर घटकाची अंमलबजावणी पूर्ण करून अनुदान मागणी प्रकल्पाच्या DBT पोर्टलद्वारे करावी.

५. पाईप खरेदी केल्यानंतर लाभार्थीने प्रत्येक पाईपवर शेतकऱ्याचे नाव, प्रकल्पाचे नाव व वर्ष टाकणे (EMBOSING) बंधनकारक आहे.

६. अनुदान मागणी करताना संबंधित घटकाचे देयके, अधिकृत वितरक असल्याबाबतचे प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे अपलोड करावे.

## ग्राम कृषि विकास समिती (GKVS)

१. सदर घटकाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती व जमातीमधील शेतकऱ्यांमध्ये प्रचार- प्रसिद्धी करावी.
२. प्राप्त सर्व अर्ज व सादर केलेल्या कागदपत्रांची समूह सहाय्यक व सहाय्यक कृषि अधिकारी यांचे मदतीने छाननी करावी.
३. अर्जदारांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेतून लाभ घेतला नसल्याबाबतची खातरजमा करण्यात यावी
४. इच्छुक लाभार्थ्यांच्या प्राप्त अर्जांच्या पात्र/अपात्रतेबाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
५. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकाचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

## समूह सहाय्यक

१. इच्छुक लाभार्थी शेतकऱ्यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
२. शेतकऱ्यांचे ऑनलाईन नोंदणी अर्ज व शेतकऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करणे.
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेतून लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देता येणार नाही.
४. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर बैठकीचे इतिवृत्त संकेतस्थळावर अपलोड करणे.
५. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.
६. शेतकऱ्यांना योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगणे.

## सहाय्यक कृषि अधिकारी

अ. (डेस्क-२)

१. लाभार्थीचा ऑनलाईन अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. ग्राम कृषि विकास समितीने (GKVS) मान्यता दिलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या छाननी आधारे अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करुन प्रकल्प स्थळ संबंधित घटकासाठी योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणे तसेच सदर घटकाचा लाभ लाभार्थ्याने अथवा त्याच्या कुटुंबातील सदस्याने घेतला आहे काय, याबाबत खात्री करावी.
३. डेस्क-२ वरती उपलब्ध करून दिलेला ONLINE स्वरूपातील अहवाल आवश्यक खातरजमा करून भरण्यात यावा.
४. प्रकल्पाच्या DBT App द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून फोटो अपलोड करावे.
५. डेस्क २ वरील छाननी अंती लाभार्थी पात्र ठरत असल्यास सदर अर्ज शिफारशीसह पूर्वसंमती साठी पुढील डेस्क वर पाठवावा.
६. अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर परत पाठविण्यात यावे.

ब. डेस्क-४

१. लाभार्थ्याने अपलोड केलेले देयके व अनुषंगिक कागदपत्रांची छानणी करणे.
२. लाभार्थ्याने पूर्ण केलेल्या घटकाची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मोका तपासणी करणे.
३. सदर घटकाची अंमलबजावणी तांत्रिक मापदंडानुसार करण्यात आली आहे काय याची खातरजमा करणे.
४. प्रकल्पाच्या DBT APP द्वारे लाभार्थी/लाभार्थी प्रतिनिधीसह पूर्ण झालेल्या घटकाचे फोटो अपलोड करावे.
५. विहित नमुन्यातील मोका तपासणी अहवाल, अनुदानाची परिगणना करून तयार करणे.
६. प्रकल्पाच्या DBT प्रणालीवरती मोका तपासणी अहवाल,देयकांची साक्षांकित प्रत ई. कागदपत्रे अपलोड करून प्रकरण पुढील डेस्क वर पाठविणे .
७. छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास DBT प्रणालीवर त्रुटी नमूद करून प्रकरण लाभार्थी स्तरावर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

## उप कृषि अधिकारी

१. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिद्धी करणे.
२. लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.
३. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे याची वेळोवेळी पडताळणी करणे. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

## मंडळ कृषि अधिकारी

१. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिद्धी करणे.
२. लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.
३. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे याची वेळोवेळी पडताळणी करणे. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

## तालुका कृषि अधिकारी

१. लाभार्थ्याचा प्राप्त अर्ज, अर्जासोबत अपलोड केलेली कागदपत्रे, ग्राम कृषि विकास समिती बैठकीचे इतिवृत्त, डेस्क-२ वरील स्थळ पाहणी अहवाल व फोटो यांची छानणी करणे.
२. सदर लाभार्थ्याने अथवा त्याच्या कुटुंबातील सदस्याने सदर घटकाचा लाभ इतर कोणत्याही शासकीय योजनेतून घेतला आहे काय याची खातरजमा करणे.
३. छानणी अंती लाभार्थी पात्र ठरत असल्यास लाभार्थ्यास पूर्वसंमती प्रदान करणे.
४. छानणी अंती अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास सदर अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी त्रुटी नमूद करून DBT प्रणालीद्वारे मागील डेस्क वर पाठविण्यात यावे.
५. लाभार्थी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पात्र ठरत नसल्यास सदरील अर्जास पूर्वसंमती नाकारण्यात यावी.

६. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे याची वेळोवेळी पडताळणी करणे. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

### लेखाधिकारी

१. अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करावी.
२. मोका तपासणी अधिकारी यांनी शिफारस केलेली अनुदानाची रक्कम मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योग्य आहे का याची पडताळणी करणे.
३. अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास त्रुटी नमूद करून अर्ज मागील डेस्क वर पाठविण्यात यावा.
४. छानणी अंती पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

### उपविभागीय कृषि अधिकारी

१. अनुदान प्रस्तावाची संपूर्ण छानणी करून शिफारशीत करण्यात आलेले अनुदान योग्य असलेबाबत पडताळणी करणे.
२. छानणी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगीस अंतिम मान्यता देणे.
३. छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास DBT प्रणलीवर त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.
४. योजनेचे संनियंत्रण करणे.
५. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे याची वेळोवेळी पडताळणी करणे. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

### जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

१. जिल्ह्यामध्ये सदर घटकाच्या अनुषंगाने लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.
३. योजनेचे सनियंत्रण करणे.

### विभागीय कृषि सहसंचालक:

१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. विभाग स्तरावर घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.
३. सदर घटकाची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे.

**क्षेत्रीय पर्यवेक्षीय तपासणी** - योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय स्तरावरून पर्यवेक्षीय तपासणी करणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणात किमान तपासणी करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी अधिकारी पदनाम | तपासणीची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | उप कृषि अधिकारी | २५ % | |
| २ | मंडळ कृषि अधिकारी | १० % | |
| ३ | तालुका कृषि अधिकारी | ५ % | |
| ४ | उपविभागीय कृषि अधिकारी | ३ % | |
| ५ | नोडल अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय | किमान २ प्रकरणे प्रति माह | |
| ६ | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | किमान १ प्रकरणे प्रति माह | |
| ७ | नोडल अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय | किमान १ प्रकरणे प्रति माह | |
| ८ | विभागीय कृषि सहसंचालक | किमान १ प्रकरण प्रति माह | |

# हमीपत्र
# पंप संच

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **"पंप संच"** या घटकाकरिता ऑनलाईन अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. पंप संच या घटकाचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीला घेता येईल, याची मला जाणीव आहे.

२. सदर घटकाचा लाभ मी अथवा माझ्या कुटुंबातील इतर सदस्यांनी यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून घेतलेला नाही.

३. सदर योजने अंतर्गतची कामे मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषांनुसार पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.

४. सदर योजनेअंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणकापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च मी स्वत: करील.

५. सदर घटकाचा लाभ मिळाल्यापासून **किमान ५ वर्षाकरिता** त्याचा वापर करून देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी माझी राहील, याची मला जाणीव आहे.

६. प्रकल्पांतर्गत लाभ घेण्यासाठी माझ्याकडून फसवणूक किंवा खोटी माहिती, कागदपत्रे दिली गेली असे आढळून आल्यास प्रकल्प व्यवस्थापन कक्षास अनुदान थांबवण्याचा किंवा वसूल करण्याचा पूर्ण अधिकार असेल.

७. मी प्रकल्पाच्या अधिकारी/प्रतिनिधींना सदर घटकाशी संबंधित प्रकल्प स्थळ, साहित्य किंवा नोंदी तपासण्यासाठी परवानगी देईन आणि पूर्ण सहकार्य करीन.

८. मी प्रकल्पांतर्गत लाभ घेतलेल्या घटकाचे प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निर्धारित कालावधीपर्यंत देखभाल व जतन करणार असल्याची हमी देत आहे. निर्धारित कालावधीपर्यंत जतन व देखभाल न केल्यास मला दिलेले अनुदान वसूलपात्र राहील याची मला जाणीव आहे.

९. मी घोषित करतो/ करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

# हमीपत्र
# पाईप

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी “**पाईप**” या घटकाकरिता ऑनलाईन अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. पाईप या घटकाचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीला घेता येईल, याची मला जाणीव आहे.
२. सदर घटकाचा लाभ मी अथवा माझ्या कुटुंबातील इतर सदस्यांनी यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून घेतलेला नाही.
३. सदर योजने अंतर्गतची कामे मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषांनुसार पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.
४. सदर योजनेअंतर्गत प्रकल्पाने मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणकापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च मी स्वत: करील.
५. सदर घटकाचा लाभ मिळाल्यापासून **किमान ५ वर्षाकरिता** त्याचा वापर करून देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी माझी राहील, याची मला जाणीव आहे.
६. प्रकल्पांतर्गत लाभ घेण्यासाठी माझ्याकडून फसवणूक किंवा खोटी माहिती, कागदपत्रे दिली गेली असे आढळून आल्यास प्रकल्प व्यवस्थापन कक्षास अनुदान थांबवण्याचा किंवा वसूल करण्याचा पूर्ण अधिकार असेल.
७. मी प्रकल्पाच्या अधिकारी/प्रतिनिधींना सदर घटकाशी संबंधित प्रकल्प स्थळ, साहित्य किंवा नोंदी तपासण्यासाठी परवानगी देईन आणि पूर्ण सहकार्य करीन.
८. मी प्रकल्पांतर्गत लाभ घेतलेल्या घटकाचे प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निर्धारित कालावधीपर्यंत देखभाल व जतन करणार असल्याची हमी देत आहे. निर्धारित कालावधीपर्यंत जतन व देखभाल न केल्यास मला दिलेले अनुदान वसूलपात्र राहील याची मला जाणीव आहे.
९. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

# मोका तपासणी अहवाल
(पाईप)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | प्रवर्ग | |
| ३. | गावाचे नाव | |
| ४. | तालुका | |
| ५. | जिल्हा | |
| ६. | तपासणी दिनांक | |
| ७. | घटक व प्रकार | पाईप -पीव्हीसी/एचडीपीई /एचडीपीई लॅमीनेटेड |
| ८. | पूर्वसंमती क्रमांक व दिनांक | |
| ९. | मंजूर असलेल्या प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. | |
| १०. | उत्पादकाचे नाव | |
| ११. | विक्रेत्याचे नाव | |
| १२. | सदर विक्रेता संबंधित उत्पादक कंपनीचा अधिकृत विक्रेता आहे काय ? | होय/नाही |
| १३. | मोका तपासणी तपशिल | पाईप प्रकार------------------<br>व्यास (मि..मी.-------------------<br>संख्या ------------------<br>एकूण लांबी (मी.)----------------<br>किंमत (रु.) ------------------ |
| १४. | अनुदानाची गणना: (पाईप, दर, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>१.पूर्वसंमती नुसार मंजूर रक्कम रु.----------------<br>२.देयकाची रक्कम रु. ---------------<br>३.मोका तपासणीनुसार शिफारशीत करण्यात येत असलेल्या अनुदानाची रक्कम रु. -------------- | |

सदर घटकाची अंमलबजावणी लाभार्थ्याने मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केली असल्याने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

समक्ष-
लाभार्थी/प्रतिनिधी स्वाक्षरी
(श्री. )

स्वाक्षरी---------------------
नाव ------------------------
पदनाम सहाय्यक कृषि अधिकारी

# मोका तपासणी अहवाल

(विद्युत पंप संच/डिझेल इंजिन पंप संच)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | प्रवर्ग | |
| ३. | गावाचे नाव | |
| ४. | तालुका | |
| ५. | जिल्हा | |
| ६. | तपासणी दिनांक | |
| ७. | घटक व प्रकार | विद्युत पंप संच/डिझेल इंजिन पंप संच |
| ८. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ९. | मंजूर असलेल्या प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. | |
| १०. | उत्पादकाचे नाव | |
| ११. | विक्रेत्याचे नाव | |
| १२. | सदर विक्रेता संबंधित उत्पादक कंपनीचा अधिकृत विक्रेता आहे काय ? | होय/नाही |
| १३. | मोका तपासणी तपशील | पंप संच - विद्युत / डिझेल इंजिन क्षमता (एच.पी.)-----------<br>किंमत (रु.) ------------<br>ISI मानांकन - होय/नाही |
| १४. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे पंपसंच समवेत नमूद अनुषंगिक साहित्य खरेदी करण्यात आले आहे काय ? | |

| पंप संच साहित्य तपशील | होय/नाही | साहित्य खरेदी करण्यात आले आहे काय ? | होय/नाही |
|---|---|---|---|
| कपॅसिटर | | उत्तम दर्जाचे पाईप | |
| मेन स्विच | | उत्तम दर्जाचे Bend | |
| उत्तम दर्जाचे होज निपल (क्लिप सह) | | वायर रोप | |
| फूट व्हॉल्व | | उत्तम दर्जाचे निपल क्लिप्स | |
| केबल | | अर्थिंगसाठी आवश्यक साहित्य | |
| कंट्रोल पॅनल बॉक्स | | | |

| | |
|---|---|
| १५. | अनुदानाची गणना: पंप संच, दर, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>१.पूर्व संमती नुसार मंजूर रक्कम - रु.---------------<br>२.देयकाची रक्कम - रु. --------------<br>३.मोका तपासणीनुसार शिफारशीत करण्यात येत असलेल्या अनुदानाची रक्कम रु. -------------- |

सदर घटकाची अंमलबजावणी लाभार्थ्याने मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केली असल्याने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

समक्ष-

लाभार्थी/प्रतिनिधी स्वाक्षरी

(श्री. )

स्वाक्षरी--------------------

नाव ----------------------

पदनाम सहाय्यक कृषि अधिकारी

# पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती | |
| ३. | पदनाम | | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम | |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | श्री/श्रीमती<br>सर्वे नं./गट न. _________<br>प्रवर्ग (अ.जा./अ.ज.)___________<br>मु.पो. ____________________<br>ता. _________ उपविभाग ___________<br>जि. ________ | |
| ६. | बाब | विद्युत पंप संच /डिझेल इंजिन / पाईप | |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | | |
| ८. | उत्पादकाचे नाव | | |
| ९. | विक्रेत्याचे नाव | | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १.विद्युत /डिझेल इंजिन पंप संच - I. क्षमता---------------<br>II. ISI मानांकित आहे काय? ------------------<br>२.पाईप -<br>प्रकार------------------<br>व्यास-----------------<br>लांबी ------------------ | |
| ११. | तपासणी अधिकारी यांनी शिफारस केलेली रक्कम रु. | | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | | होय/नाही |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | | |

| | | |
|---|---|---|
| १३. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १४. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १५. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

तपासणी अधिकारी, श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी

(नाव..............................)